& Higher Secondary Education,
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179,
Near Balchitrawani, Behind Agharkar
Research Institute, Bhamburda,
Shivajinagar, Pune-411004.

उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८, १७९,बालचित्रवाणी
शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा,
शिवाजीनगर,
पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 । EPABX -25705000 Fax : 25665807 ।
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र.रा.मं./परीक्षा–३/ १७९७
पुणे ४११००४
दिनांक:– ०२/०५/२०२३

प्रति,
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्य.शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

विषय :– शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासूनच्या थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश पात्रतेबाबत.

संदर्भ :– १ तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचे परिपत्रक क्र. १०/एडीम/थेट द्वितीय वर्ष पदविका प्रवेश/२०२२/४९३, दि. १५/०६/२०२२.
२ तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचे परिपत्रक क्र. १०/एडीम/थेट द्वितीय वर्ष पदविका प्रवेश/२०२३/२६९, दि. ३१/०३/२०२३.

उपरोक्त विषयी राज्यातील HSC Vocational (MCVC) उत्तीर्ण विद्यार्थी थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशापासून वंचित राहू नये म्हणून शैक्षणिक वर्ष २०२२–२३ व २०२३–२४ या दोन वर्षांकरीता अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या सवलतीस अनुसरून थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचे परिपत्रक क्रमांक १०/एडीम/थेट द्वितीय वर्ष पदविका प्रवेश/२०२२/४९३, दि. १५/०६/२०२२ नुसार प्रवेश पात्रता निश्चित करण्यात आलेली आहे. त्यामधील अनुच्छेद क्र. ४ अन्वये शैक्षणिक वर्ष २०२२–२३ मध्ये HSC Vocational (MCVC) उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२३–२४ मध्ये थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अंतिम संधी राहील.

तसेच शैक्षणिक वर्ष २०२४–२५ व त्यापुढे संदर्भिय परिपत्रक १मधील अनुच्छेद क्र. २ मध्ये नमूद केलेल्या अथवा अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी त्यावेळी अधिसूचित केलेल्या प्रवेश पात्रतेनुसार थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाचे प्रवेश करण्यात येतील.

याबाबत सदर परिपत्रक आपल्या विभागीय मंडळाच्या कार्यक्षेत्रातील सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांच्या निदर्शनास आणून देऊन संबंधित विद्यार्थ्यांना याबाबतची माहिती होण्याच्या अनुषंगाने उचित कार्यवाही करावी.

सोबत – संदर्भिय पत्रे – २

(अनुराधा ओक)
सचिव
राज्य मंडळ, पुणे ०४

क्र.पु.वि.मं./शाखा-अ/ २९१९
पुणे-४११००५
दि. ~~०६/०६/२०२३~~ 13/6/2023

प्रति,
प्राचार्य
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय
जिल्हा-पुणे /अहमदनगर /सोलापूर,

उपरोक्त राज्यमंडळाच्या प्रकटनाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी. सदर माहिती सर्व कनिष्ठ महाविद्यालयांनी आपल्या सूचना फलकावर लावून विद्यार्थी व पालकांच्या निदर्शनास आणून द्यावी

(अनुराधा ओक)
विभागीय सचिव
पुणे विभागीय मंडळ,पुणे-०५

महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०/४३०/४६५/४९२
ई-मेल - desk10@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

महत्त्वाचे परिपत्रक

क्रमांक: १०/एडीम/थेट द्वितीय वर्ष पदविका प्रवेश/२०२२/ ४८३ दिनांक : 15 JUN 2022

विषय : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासूनच्या थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेश पात्रतेबाबत...

संदर्भ: १) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE) यांनी त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेले Approval Process Handbook 2022-23

२) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. F. NO. : AICTE/AB/WR/ Lateral Entry/2022, दिनांक १२.०४.२०२२.

३) शासन पत्र क्र. संकिर्ण-२०२२/(प्र.क्र.४४/२२)/तांशि-५, दि. ७ जून २०२२.

महाराष्ट्र राज्यातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी व तंत्रज्ञान पदविका, औषधनिर्माणशास्त्र पदविका, हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान पदविका तसेच थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व तंत्रज्ञान पदविका या अभ्यासक्रमांची केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत पार पाडली जाते. विविध पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरीता आवश्यक असणारी प्रवेश पात्रता ही अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली तसेच फार्मसी कौन्सील ऑफ इंडीया, नवी दिल्ली अशा संबंधित अभ्यासक्रमांच्या शिखर परीषदांद्वारे वेळोवेळी जाहिर केलेल्या मानकांनुसार निश्चित केली जाते. त्यानुसार महाराष्ट्र शासनाद्वारे सदर अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकियेच्या अनुषंगाने प्रवेश नियमावली, प्रवेश पात्रता इ. घोषित केली जाते.

२. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी प्रसिध्द केलेल्या संदर्भीय १ वरील Approval Process Handbook नुसार थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी उमेदवारांची प्रवेश पात्रता खालीलप्रमाणे निश्चित केली आहे.

Passed 10+2 examination with Physics/ Mathematics /Chemistry / Computer Science /Electronics/ Information Technology/ Biology /Informatics Practices/ Biotechnology / Technical Vocational subject / Agriculture / Engineering Graphics / Business Studies / Entrepreneurship, as per table 1.3(a)

OR

10th + (2 years ITI) shall be eligible for admission to Second Year Diploma Course(s) in ANY branch of Engineering and Technology

३. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ, पुणे यांच्या अंतर्गत १०+२ Vocational (MCVC) अभ्यासक्रम राबविला जातो. या अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना Physics, Chemistry आणि Math हे विषय न शिकता व्यावसायिक विषय (Vocational Subjects) घेऊन इ.१२वीचा अभ्यासक्रम पूर्ण करण्याचा पर्याय उपलब्ध आहे. अशा विद्यार्थ्यांच्या बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी संदर्भ क्र.२ वरील पत्रानुसार थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशाबाबत खालीलप्रमाणे स्पष्टीकरण दिलेले आहे.

........ In this connection, it is informed that relaxation for 2 years (i.e. until AY. 2023-24) in the eligibility norms for Second Year Lateral Entry Diploma Courses shall be as per APH 2021-22.

This relaxation is being granted because students who are already pursuing the MCVC courses shall stand deprived. DTE Maharashtra is informed that as of academic year 2024-25 the current norms (or any subsequent amendments to it) shall prevail...........

४. राज्यातील HSC Vocational (MCVC) उत्तीर्ण विद्यार्थी थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशापासून वंचित राहू नये म्हणून शैक्षणिक वर्ष २०२२-२३ व २०२३-२४ या दोन वर्षाकरीता अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषद, नवी दिल्ली यांनी खालीलप्रमाणे सवलत दिलेली आहे. यास अनुसरुन थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता 10+2 उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या बाबतीत खालीलप्रमाणे प्रवेश पात्रता ग्राह्य धरण्यात येत आहे.

Passed 10+2 examination with Physics/ Mathematics/ Chemistry/ Computer Science/ Electronics/ Information Technology/ Biology/ Informatics Practices/ Biotechnology/ Technical Vocational subject/ Agriculture/ Engineering Graphics/ Business Studies/ Entrepreneurship (Any of the three).

५. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ व त्यापुढे अनुच्छेद क्रमांक २ मध्ये नमूद केलेल्या अथवा अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषद, नवी दिल्ली यांनी त्यावेळी अधिसूचित केलेल्या प्रवेश पात्रतेनुसार थेट द्वितीय अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांचे प्रवेश करण्यात येतील,याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

( डॉ. अभय वाघ )
संचालक,
तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई

सोबत : प्रवेश पात्रता नमूद केलेली संदर्भीय १ मधील पृष्ठ क्र. ८८ व ९० आणि संदर्भ क्र.२ चे पत्र.

प्रत माहितीसाठी सविनय सादर

१. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मंत्रालय विस्तार इमारत, मादाम कामा रोड, हुतात्मा चौक,मुंबई-४०००३२.
२. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मादाम कामा रोड, मुंबई-४०००३२.
३. मा. प्रधान सचिव, कौशल्य विकास व उदयोजकता विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

१. मा. सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ, पुणे. यांना विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या अधिपत्याखालील सर्व संबंधित कार्यालय/शाळा/महाविद्यालय यांच्या निदर्शनास आणून देऊन संबंधित विद्यार्थ्यांना याबाबतची माहिती होण्याच्या अनुषंगाने उचित कार्यवाही करावी, ही विनंती.
२. संचालक, व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या अधिपत्याखालील सर्व संबंधित कार्यालय/Vocational अभ्यासक्रम (MCVC) सुरु असलेल्या शाळा/महाविद्यालय यांच्या निदर्शनास आणून देऊन संबंधित विद्यार्थ्यांना याबाबतची माहिती होण्याच्या अनुषंगाने उचित कार्यवाही करावी, ही विनंती.
३. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, अमरावती, औरंगाबाद, मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या अधिपत्याखालील सर्व संबंधित कार्यालय/Vocational अभ्यासक्रम (MCVC) सुरु असलेल्या शाळा/महाविद्यालय यांच्या निदर्शनास आणून देऊन संबंधित विद्यार्थ्यांना याबाबतची माहिती होण्याच्या अनुषंगाने उचित कार्यवाही करावी.
४. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती, औरंगाबाद, मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे यांना माहिती व कार्यवाहीस्तव.
५. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांना माहिती व कार्यवाहीस्तव.
६. प्रणाली व्यवस्थापक, कार्यासन क्र.३, मुख्य कार्यालय, मुंबई यांनी सदरचे परिपत्रक संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०/४६५/४९२
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

<u>महत्वाचे परिपत्रक</u>

क्रमांक: १०/एडीम/थेट द्वितीय वर्ष पदविका प्रवेश/२०२३/ २६९ दिनांक : 31 MAR 2023

विषय : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासूनच्या थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश पात्रतेबाबत...

संदर्भ: या संचालनालयाचे परिपत्रक क्र. १०/एडीम/थेट द्वितीय वर्ष पदविका प्रवेश/२०२२/४९३, दि.१५/६/२०२२

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासूनच्या थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश पात्रतेबाबतचे या संचालनालयाचे संदर्भाधीन परिपत्रक कृपया पहावे.

सदर परिपत्रकामध्ये शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये इ.१०वी परिक्षा उत्तीर्ण होऊन शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये इ.११वी करीता Vocational (MCVC) अभ्यासक्रमास प्रवेश घेऊन शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये इ.१२वी Vocational (MCVC) उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी शैक्षणिक पात्रतेचे स्पष्टीकरण देण्यात आलेले आहे.

राज्यातील HSC Vocational (MCVC) उत्तीर्ण विद्यार्थी थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशापासून वंचित राहू नये म्हणून शैक्षणिक वर्ष २०२२-२३ व २०२३-२४ या दोन वर्षांकरीता अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या सवलतीस अनुसरुन थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता संदर्भाधीन परिपत्रकातील अनुच्छेद क्र.४ नुसार प्रवेश पात्रता निश्चित करण्यात आलेली आहे. सबब शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये HSC Vocational (MCVC) उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये अनुच्छेद क्र.४ मधील पात्रतेस अनुसरुन थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेश घेण्यासाठी अंतिम संधी राहील.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ व त्यापुढे संदर्भाधीन परिपत्रकातील अनुच्छेद क्र.२ मध्ये नमूद केलेल्या अथवा अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषद, नवी दिल्ली यांनी त्यावेळी अधिसूचित केलेल्या प्रवेश पात्रतेनुसार थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांचे प्रवेश करण्यात येतील, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

*सोबत : संदर्भाधीन परिपत्रक*

(डॉ. विनोद मोहितकर)
प्र.संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत माहितीसाठी सविनय सादर

१.मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मंत्रालय विस्तार इमारत, मादाम कामा रोड, हुतात्मा चौक,मुंबई-४०००३२.

२.मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मादाम कामा रोड, मुंबई-४०००३२.

३.मा.प्रधान सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२.

उ.मा. व उ.मा.शिक्षण मंडळ
सह. सचिव
19 APR 2023
सचिव अध्यक्ष
आवक क्रमांक:- २५३६
दिनांक:-

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

१. मा. सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ, पुणे. यांना विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या अधिपत्याखालील सर्व संबंधित कार्यालय/शाळा/महाविद्यालय यांच्या निदर्शनास आणून देऊन संबंधित विद्यार्थ्यांना याबाबतची माहिती होण्याच्या अनुषंगाने उचित कार्यवाही करावी, ही विनंती.

२. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई. यांना विनंती करण्यात येते की सदर परिपत्रक आपल्या अधिपत्याखालील सर्व संबंधित कार्यालय/Vocational अभ्यासक्रम (MCVC) सुरु असलेल्या शाळा/महाविद्यालय यांच्या निदर्शनास आणून देऊन संबंधित विद्यार्थ्यांना याबाबतची माहिती होण्याच्या अनुषंगाने उचित कार्यवाही करावी, ही विनंती.

३. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, अमरावती, औरंगाबाद, मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे. यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या अधिपत्याखालील सर्व संबंधित कार्यालय/ Vocational अभ्यासक्रम (MCVC) सुरु असलेल्या शाळा/महाविद्यालय यांच्या निदर्शनास आणून देऊन संबंधित विद्यार्थ्यांना याबाबतची माहिती होण्याच्या अनुषंगाने उचित कार्यवाही करावी.

४. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती, औरंगाबाद, मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे यांना माहिती व कार्यवाहीस्तव

५. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांना माहिती व कार्यवाहीस्तव.

६. प्रणाली व्यवस्थापक, कार्यासन क्र.३, मुख्य कार्यालय, मुंबई यांनी सदरचे परिपत्रक संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.